# राज्य माहिती आयोग, नाशिक खंडपीठ

(पिनॅकल मॉल,४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)

---

## माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम १९(३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपिल क्र. रामाआ/नाशिक/व्दितीय अपिल क्र. ३०२८/२०१९/अहमदनगर

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. संभाजी पाटीलबा जायभाये<br>मु. पो. भगुर पो. वरुर, ता. शेवगांव,<br>जि. अहमदनगर. | शिरस्तेदार,<br>उपविभागीय अधिकारी कार्यालय<br>पाथर्डी भाग, पाथर्डी, ता. पाथर्डी,<br>जि. अहमदनगर. | उपविभागीय अधिकारी,<br>उपविभागीय अधिकारी कार्यालय<br>पाथर्डी भाग, पाथर्डी, ता. पाथर्डी,<br>जि. अहमदनगर. |

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

## व्दितीय अपिल सुनावणी दिनांक - २८/०३/२०२३

| मुळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| ०३/०९/२०१९ | ३०/०९/२०१९ | ०१/१०/२०१९ | ---- |

अपिलार्थी यांनी दि. ११/११/२०१९ रोजीच्या अर्जान्वये " दि. ०३/०९/२०१९ रोजी कलम २ (च) प्रमाणे मागितलेली माहितीच्या पानांचे शुल्क भरण्यास, विशिष्ट मुदतीत ३० दिवसांत आत वेळेत कळविण्यात आलेले नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अद्याप माहिती पुरविली नाही. " असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे.

सदर व्दितीय अपिलाच्या सुनावणीस तत्कालीन/विद्यमान जन माहिती अधिकारी, विद्यमान व तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित होते. अपिलार्थी अनुपस्थित होते.

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

> मा. उपविभागीय अधिकारी साहेब, पाथर्डी भाग पाथर्डी ता. पाथर्डी जि. अहमदनगर यांच्याकडील श्री. संभाजी पाटीलबा जायभाये रा. भगुर, ता. शेवगांव जि. अहमदनगर यांनी दि. २९/१२/२०१७ रोजी समक्ष दाखल केलेल्या अर्जामधील विषयाच्या व अर्जातील मुद्यांच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाहीचे दस्तऐवज, हस्तलिखित व फाइल, ह्यांच्या टिपण्या, उतारे व सद्यस्थितीची माहिती कलम २ (च) प्रमाणे प्रमाणित प्रती, जन माहिती अधिकारी यांच्या स्वाक्षरीने व कार्यालयीन शिक्कयाने मिळण्यास नम्र विनंती.

तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये " माहिती प्राप्त झालेली नाही " असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

या प्रकरणी आज रोजी झालेल्या सुनावणी दरम्यान आयोगासमक्ष उपलब्ध असलेले कागदोपत्री पुरावे आणि युक्तिवादावरुन असे दिसून येते की,

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी सुचीत केले की, माहिती अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत दाखल केलेल्या अर्जाचे अनुषंगाने या कार्यालयाकडील पत्र क्र. कावि/मा.अ./५१/२०१९ दि. ३०/०९/२०१९ रोजीचे पत्रान्वये दि. २९/१२/२०१७ रोजी दिलेल्या अर्जातील बाब ही तहसिलदार शेवगांव यांच्या अधिकारातील असल्याने तहसिलदार शेवगाव यांना या कार्यालयाचे पत्र क्र. कावि/२६५/२०१७ दि. ०३/०१/२०१९ अन्वये कार्यवाही करणेबाबत कळविले आहे. असे अपिलार्थीस दि. ३०/०९/२०१९ रोजी रजिस्टर पोष्टाने मुदतीत कळविण्यात आले आहे.

२) तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारीत केला नसल्याचे दिसुन येते.

३) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, उ.अ. कार्यालय पाथर्डी भाग, पाथर्डी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न देऊन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग केला आहे, त्यामुळे ते दंडात्मक कार्यवाहीस प्रथमदर्शनी पात्र ठरतात.

४) तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, पाथर्डी भाग, पाथर्डी यांनी प्रथम अपील आदेश पारीत केला नाही. त्यामुळे त्यांनी अधिनियमाच्या कलम १९ (६) चा भंग केलेला आहे, त्यामुळे ते शिस्तभंगविषयक कार्यवाहीस प्रथमदर्शनी पात्र ठरतात.

५) या प्रकरणी अपिलार्थी यांना अद्यापही माहिती प्राप्त झालेली नाही. प्रस्तुत प्रकरणी एकूण परिस्थितीचा विचार करता अधिनियमातील कलम १९(८) (क) मध्ये नमूद केल्या प्रमाणे राज्य माहिती आयोगास निर्णय प्रक्रियेत अधिनियमाच्या तरतुदींचे अनुपालन करण्यासाठी आवश्यक असतील अशी उपाययोजना करण्यात सार्वजनिक प्राधिकरणाला फर्माविण्याचा अधिकार आहे. त्यानुसार कलम १९ (८) (क) (२) नुसार जन माहिती अधिकारी म्हणून नियुक्ती करण्याच्या तरतुदींस अधीन राहुन या प्रकरणी उपविभागीय अधिकारी, पाथर्डी यांना जन माहिती अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. सबब,आता या प्रकरणी उपविभागीय अधिकारी, पाथर्डी यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने संबंधितां कडून माहिती प्राप्त करुन घेऊन पुरविणे योग्य होईल.

६) या प्रकरणी आयोगाच्या आदेशानुसार विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगास सुनावणीदरम्यान शपथपत्र दिले आहे की, "अपिलार्थींनी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती १५ दिवसांत अपिलार्थीस

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

नोंदणीकृत टपालाद्वारे तात्काळ विनामुल्य उपलबध करुन देण्यात येईल व त्याचा अहवाल आयोगास सादर करण्यात येईल."

सबब, या प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**आदेश**

१) माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (८) (क) (२) नुसार उपविभागीय अधिकारी, पाथर्डी यांना या प्रकरणी जन माहिती अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे. उपविभागीय अधिकारी, पाथर्डी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांच्या आत अपिलार्थीने जोडपत्र "अ" मध्ये मागणी केलेली माहिती संबंधितां कडून प्राप्त करुन घेऊन अपिलार्थीस नोंदणीकृत पोचदेय डाकेने विनामूल्य पुरवावी.

२) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार, उ.अ. कार्यालय पाथर्डी भाग, पाथर्डी यांनी विहित मुदतीत माहिती न देऊन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग केलेला असल्याने त्यांचेविरुध्द कलम २० मधील तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये याचा लेखी खुलासा त्यांनी आयोगाचे आदेश प्राप्त होताच तात्काळ आयोगास सादर करावा.

३) जिल्हाधिकारी, अहमदनगर यांना आदेशित करण्यात येते की, तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उपविभागीय अधिकारी कार्यालय, पाथर्डी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी न घेऊन, आदेश न पारीत करुन अधिनियमातील कलम १९ (६) आणि दि.१२/१२/२००७ चा भंग केला असल्याची खातरजमा झाल्यास त्यांच्याविरुध्द दि.३१/०३/२००८ मधील तरतुदीनुसार कार्यवाही करावी.

वरील निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

**(समीर सहाय)**
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नाशिक

प्रतिलिपी- माहिती तथा आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित.

जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर, ता. जि. अहमदनगर.

यांना कळविण्यात येते की, सामान्य प्रशासन विभागाच्या शासन परिपत्रक क्र.केंमाअ-२००८/६८८/प्र.क्र.२१९/०८/९ (मा.अ.) दि.१०/०६/२००८ मधील सुचनांनुसार आयोगाने दिलेल्या आदेशांचे पालन करण्यात येईल याची दक्षता घ्यावी. तसेच सदरचा आदेश सर्व संबंधितांवर बजावून त्याची दिनांकित पोच आयोगास सादर करावी.

**जावक क्र.** औ-१४ec दि-०६/१०/२०२३